महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २१ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## टिटवाळ्यात भाजपमध्ये 'जोरदार इन्कमिंग'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा, ता. २० :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहने-टिटवाळा परिसरात भारतीय जनता पक्षात मोठ्या प्रमाणात 'इन्कमिंग' (नवीन प्रवेश) सुरू आहेत; मात्र कोणत्याही राजकीय पार्श्वभूमीची किंवा कामकाजाची तपासणी न करता थेट प्रवेश दिल्यामुळे पक्षासाठी अनेक वर्षे काम करणाऱ्या जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजीचा भडका उडाला आहे.

स्थानिक जुन्या कार्यकर्त्यांचा आरोप आहे, की त्यांना विचारात न घेता आणि नवीन कार्यकर्त्याची पार्श्वभूमी न तपासता केवळ तिकिटाच्या आशेने येणाऱ्यांना पक्षात थेट स्थान दिले जात आहे. यामुळे पक्षासाठी आयुष्य वेचलेल्या जुन्या कार्यकर्त्यांचा सन्मान भंग होत आहे, असा सूर स्थानिक पातळीवर उमटत आहे. या वाढत्या असंतोषाला मूर्त स्वरूप देत टिटवाळ्यातील दोन महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या निर्णय प्रक्रियेवर आक्षेप घेत आपले राजीनामे सादर केले आहेत. माजी नगरसेवक सुरेश भोईर, जिल्हा सचिव प्रदीप भोईर यांनी पक्षासाठी ५० वर्षे संघर्ष केल्यानंतर नवीन येणारे कार्यकर्ते जर जुन्याजाणत्यांना विचारात घेत नसतील, तर इतकी वर्षे पक्षात काम करून काय फायदा, असा सवाल उपस्थित केला आहे.

मोहने परिसरातील अनेक पदाधिकारी आणि जुने कार्यकर्ते समाज माध्यमातून जाहीरपणे पक्षाच्या या धोरणाविरोधात नाराजी व्यक्त करीत आहेत. लवकरच सामूहिक राजीनाम्याची चळवळ उभी राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानिक पातळीवर निर्माण झालेला हा अंतर्गत असंतोष आगामी निवडणुकीच्या काळात भाजपला महागात पडू शकतो, अशी शक्यता राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त होत आहे. वरिष्ठांनी स्थानिक पातळीवर प्रवेश देताना जुन्याजाणत्या कार्यकर्त्यांना विश्वासात घ्यावे आणि त्यांच्याशी सल्लामसलत करूनच प्रवेश निश्चित करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

## नोटीस स्वीकारण्यास अमित ठाकरेंचा नकार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, ता. २० (वार्ताहर) :** नेरूळमधील शिवस्मारक अनावरणप्रकरणी मनसे नेते अमित ठाकरेंसह ४० मनसैनिकांवर गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणात अमित ठाकरे यांनी स्वतः पोलिस ठाण्यात येऊन नोटीस स्वीकारणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे हे प्रकरण तापण्याची शक्यता आहे.

नेरूळ येथील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मनसे नेते अमित ठाकरे यांनी विनापरवानगी अनावरण केले होते. या पुतळ्याच्या अनावरणावेळी मनसैनिकांनी मोर्चा काढला. तसेच पोलिसांना धक्काबुक्की करून सरकारी आदेशांचे उल्लंघन केले होते. त्यामुळे नेरूळ पोलिसांनी अमित ठाकरेसह ४० मनसैनिकांवर जमावबंदीचे उल्लंघन, बेकायदेशीर मोर्चा काढणे, पोलिसांना धक्काबुक्की करणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, पालिकेचे नुकसान करणे, आदी कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात चौकशीसाठी पोलिस ठाण्यात हजर राहण्यासंदर्भात बुधवारी नेरूळ पोलिसांचे अंमलदार अमित ठाकरे यांच्या बंगल्यावर गेले होते, मात्र पोलिसांची नोटीस स्वीकारण्यास नकार दिला. तसेच स्वतः पोलिस ठाण्यात हजर राहणार असल्याचे सांगितले. त्यामुळे हा मुद्दा तापण्याची शक्यता आहे.

## मेट्रो मार्गिकेवर काम करताना निष्काळजीपणा सुपरवायझरचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मीरा-भाईंदर मेट्रो मार्गिका क्रमांक ९ वर काम करताना झालेल्या निष्काळजीपणामुळे ४२ वर्षीय सुपरवायझरचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना १५ नोव्हेंबर रोजी घडली. सुरक्षा जाळी, सेफ्टी बेल्ट, जॅकेट किंवा हेल्मेट यांसारखी मूलभूत सुरक्षासाधने उपलब्ध करून न दिल्याने आणि त्यांचा वापर न झाल्याने फरहान तहजीब अहमद (४२) हे साईबाबानगर मेट्रो स्टेशनवर ६५ फूट उंचीवरून खाली पडले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सुरक्षेतील गंभीर त्रुटी दाखवत खालील दंडात्मक कारवाई केली. कंत्राटदार कंपनीवर ५० लाखांचा दंड तर सल्लागार कंपनीवर ५ लाखांचा दंड आणि मृतकाच्या कुटुंबाला तत्काळ ५ लाखांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.



## पुर्नविकसित इमारतींमधील भाडेकरूंना नोंदणी शुल्क माफ

### समूह विकास प्रकल्पांचा मार्ग मोकळा

**बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 2034 च्या नियमावलीनुसार समूह विकासात रहिवाशांना किमान 35 चौ.मी. कार्पेट क्षेत्र देणे बंधनकारक आहे. याशिवाय समूह विकासात आकारमानानुसार 10 टक्के ते 35 टक्क्यांपर्यंत अतिरिक्त क्षेत्र आणि 35 टक्के फंजिबल क्षेत्र (अधिकृत अतिरिक्त बांधकाम) मिळते. या सर्व वाढीव क्षेत्राला आता जुन्या जागेच्या बदल्यात मिळणारी जागा मानून, त्यावर नाममात्र दराने मूल्यांकन निश्चित केले जाईल. यामुळे पुनर्विकास प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता वाढणार असून अनेक वर्षांपासून रखडलेल्या मुंबईतील समूह प्रकल्पांचा मार्ग मोकळा होणार आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई महापालिका क्षेत्रातील समूह विकास (क्लस्टर डेव्हलपमेंट) योजनेंतर्गत जुन्या इमारतींमधील भाडेकरू आणि रहिवाशांना पुर्नविकसित नवीन इमारतीत जागा देताना नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयानुसार 400 चौरस फुटावरून 600 चौरस फुटापर्यंतच्या घरांसाठी राहिवाशांना नोंदणी शुल्क भरावे लागणार नाही.

जुन्या इमारतींमधील रहिवाशांना पुर्नविकसात मिळणाऱ्या वाढीव क्षेत्रावर बांधकाम दराने किंवा रेडीरेकनरच्या दराने मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मात्र, आता कसमूह विकासात पात्र भाडेकरूंना मिळणारे मूळ क्षेत्र, अतिरिक्त क्षेत्र आणि जास्तीचे बांधकाम क्षेत्र या सर्वांचे एकत्रित मूल्यांकन सवलतीच्या दरात केले जाणार आहे. मुंबईतील समूह विकास योजनेंतर्गत रखडलेल्या पुर्नविकास प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि जुन्या इमारतींमधील रहिवाशांना हक्काचे मोठे घर मिळावे यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या निर्णयाबद्दल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. मुंबईतील लक्षावधी कुटुंबांना या निर्णयाचा लाभ होईल. शिवाय नवीन घराचे बांधकाम क्षेत्र 200 चौरस फूट वाढूनही नोंदणी शुल्क माफ होणार असल्याने सर्वसामान्य मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यापूर्वी अतिरिक्त क्षेत्रावर पूर्ण दराने शुल्क आकारले जात असे, ज्यामुळे मुद्रांक शुल्क जास्त येत होते.

## जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधीत शेतकऱ्यांना लाभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बातमीदार

**ठाणे :** सप्टेंबर महिन्यात भात पीक शेतात उभे असताना आलेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील उभी पिके आडवी झाली होती. त्याचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याचे नियोजन केले जात असतानाच ऑक्टोबर महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने शेतात कापून ठेवलेल्या भातपिकाचे नुकसान झाले. याचे पंचनामे तहसीलदार अभिजित खोले यांनी दिल्यानंतर ग्राम महसूल अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व ग्रामसेवक यांनी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतजमिनींची पाहणी करून पंचनामे केले.

सप्टेंबर महिन्यातील नुकसानग्रस्त व ऑक्टोबर महिन्यातील नुकसानग्रस्त 9,254 शेतकऱ्यांच्या 3016.5 हेक्टर शेतजमिनीचे पंचनामे केले होते. त्यातील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना सुमारे 2 कोटी 42 लाख 83 हजार 116 रुपये मंजूर केले गेले. ते परस्पर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतात कापून ठेवलेल्या भातशेतीचे नुकसान झाले. त्यावेळी सुद्धा 9817 शेतकऱ्यांच्या 3856.47 हेक्टर शेतजमिनींचे पंचनामे करण्यात आले.

या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सुमारे 3 कोटी 30 लाख 80 हजार रुपयांची मागणी शासनाकडे महसूल प्रशासनाने केली आहे, अशी माहिती तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली आहे.

**अतिवृष्टी व अवकाळी पावसाने तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सुरुवातीला शेतातील उभी पिके आडवी झाली, तर अवकाळी पावसात शेतात कापून ठेवलेल्या पिकाचे नुकसान झाले. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना हे पंचनामे केल्यानंतर मदत मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.**

## डोंबिवलीत राजकीय भूकंपाचे संकेत ?

### बडा नेता भाजपच्या वाटेवर !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** यापूर्वी नेहमीच पदोपदी अपमान झेललेला, आता पक्षात फार काही किम्मत मिळत नसलेला शिंदे शिवसेनेतील डोंबिवली पश्चिमेतील एक वजनदार नगरसेवक आपल्या कुटुंब, कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश करण्याची जोरदार आखणी करत आहे.

अशाच पध्दतीने संत साहित्याचा गाढा अभ्यास असलेला पश्चिमेतील एक वजनदार सामाजिक कार्यकर्ता, दोन माजी नगरसेवक आपल्या नेत्याच्या इशाऱ्यावरून भाजपमध्ये प्रवेश करण्यासाठी सज्ज असल्याची विश्वसनीय माहिती आहे. या चार जणांच्या व्यतिरिक्त यापूर्वी पालिकेत मानाचे पद उपभोगलेला आणि मागील २५ वर्ष पालिकेत स्वत, पत्नीसह नगरसेवक म्हणून निवडून गेलेला, मानाचे पद उपभोगलेला नगरसेवक पत्नीसह भाजपच्या वाटेवर येण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. या सर्व माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्त्यांनी भाजपमधील आपल्या प्रवेशाविषयी कमालीची गुप्तता बाळगली आहे.

## ठाकरेंच्या सेनेत उमेदवारीवरून धुसफूस असहकार्याचे हत्यार उपसणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ / ता. २० :** अंबरनाथ नगर परिषद निवडणुकीत भाजप-शिंदे गटाला रोखण्यासाठी शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांनी एकत्रितपणे रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला; मात्र उमेदवारी जाहीर होताच या नव्या महाआघाडीत अंतर्गत नाराजीचे वारे वाहू लागले आहेत. विशेषतः काही प्रभागांत मनसेच्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिल्याने ठाकरे गटातील अनेक पदाधिकाऱ्यांनी असंतोष व्यक्त करीत असहकार्याचे हत्यार उपसल्याची चर्चा आहे. शहरातील राजकीय समीकरणे आधीच गुंतागुंतीची झाली आहेत. महायुतीतील समन्वयाचे गणित बिघडले असून शिवसेना-भाजपमध्ये थेट लढत होणार आहे. काँग्रेस आणि अजित पवार गट यांनीदेखील नगराध्यक्षपदासाठी आपले उमेदवार उभे केले आहेत. असे असले तरीही शिवसेना शिंदे गट आणि भाजपला तगडी टक्कर देण्यासाठी शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांची अंबरनाथमध्ये युती झाली आहे.

ठाकरे सेनेच्या मशाल चिन्हावर मनसे निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे ठाकरे गट-मनसेची युती भाजपविरोधात मोठे अस्त्र मानली जात होती; मात्र उमेदवारी वाटपात अंतर्गत नाराजी डोकावू लागल्याने युतीचा जोर कमी होत असल्याचे चित्र दिसत आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांत शिवसेना शिंदे गटाविरोधात आघाडी घेणाऱ्या ठाकरे गटातील निष्ठावंतांना यंदा पालिका निवडणुकीत संधी मिळेल, अशी अपेक्षा होती; पण जागावाटपात शिवसेना ठाकरे गटाकडून ३५ तर मनसेकडून ११ उमेदवार जाहीर झाले. विशेष म्हणजे, मनसेचे उमेदवारदेखील ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावरूनच निवडणूक लढवत आहेत. यात काही महत्त्वाच्या प्रभागांत शिवसेना ठाकरे गटातील इच्छुकांना मागे सारून मनसेला प्राधान्य दिल्याने नाराज पदाधिकारी असहकार्याच्या भूमिकेत असल्याचे बोलले जात आहे. काही ठिकाणी कार्यालयीन मदत, बूथ व्यवस्थापनापासून प्रचारयंत्रणा पर्यंत सहकार्य कमी होत असल्याच्या चर्चा शहरात रंगत आहेत.

## भाजपने प्रचारासाठी काढलेल्या उर्दू पत्रकांचे स्वागत - आमदार रईस शेख



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी)** नगरपंचायती आणि नगरपरिषदांच्या निवडणुकीचा राज्यात प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोचला असून भाजप नेत्यांनी आपल्या उरण येथे उमेदवारांच्या प्रचारार्थ चक्क उर्दू भाषेमधून पत्रके छापून घेतली आहेत. त्यामुळे भाजपच्या उर्दू पत्रकांचे भिवंडी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी स्वागत केले आहे.

उर्दू ही एका धर्माची भाषा नसल्याची भाजपला विलंबाने का होईना, पण खात्री पटली आहे, असे परखड मत आमदार शेख यांनी व्यक्त केले आहे. रायगड जिल्ह्यातील 'उरण'चे भाजप आमदार महेश बालदी यांचे कार्यकर्ते नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये उर्दू भाषेतील पत्रके वाटून प्रचार करत आहेत. त्यावर बोट ठेवत आ. रईस शेख यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, 'एकीकडे धर्माच्या आधारे मुस्लीमांचा व्देष करायचा आणि त्यांच्या मतांची जेव्हा गरज पडते तेव्हा उर्दू भाषेचा आधार घ्यायचा', असे भाजपचे दुटप्पी धोरण आहे. भाजपने उर्दूमधून प्रचार पत्रके छापल्याबद्दल राज्याचे मत्स्यव्यवसाय विकास व बंदरे मंत्री नितीश राणे यांनी भावना व्यक्त करायला हव्यात. राज्यात उर्दू साहित्य अकादमी आहे. मात्र मुस्लीमांसाठी काम करणारी संस्था म्हणून या अकादमीला सापत्न वागणूक दिली जाते. निधी नाही, कार्यालय नाही, कर्मचारी नाहीत अशी उर्दू अकादमीची अवस्था आहे. उर्दू भाषा केंद्र, उर्दू शाळा, उर्दू भाषक शिक्षक, उर्दू घर यांना निधी व जागा दिली जात नाही. पाच दशके चालू असलेले 'लोकराज्य' हे उर्दू मासिक भाजपा सरकारने बंद केले. उर्दू भाषा व मुस्लीमांविषयी इतका व्देष बाळगणाऱ्या भाजपला निवडणूक आली की उर्दू आणि मुस्लीम मतांचा कळवळा का यावा, असा सवाल आ. शेख यांनी विचारला आहे.

उर्दू कोणत्या धर्माची भाषा नाही. बॉलीवूडच्या प्रगतीत उर्दू भाषक साहित्यिक व गीतकारांचे मोठे योगदान आहे.भाजपने भाषा आणि धर्मावरुन केवळ स्वार्थी राजकारणासाठी व्देष पसरवण्याचे आपले कारस्थान बंद करावे, असा सल्ला आ. रईस शेख यांनी भाजपला दिला आहे.







## कांदळवनाच्या जागेत लपवली बेकायदा उपसा केलेली रेती ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी : भिवंडी तालुक्यातील केवणी गावात गेल्या काही महिन्यांपासून माफिया बेकायदेशीरपणे खाडीतून रेतीचा उपसा करीत असल्याची बाब उघडकीस आली आहे. वनखात्याच्या कांदळवन जागेत ही रेती लपवण्यात आली होती. महसूल विभागाला याची माहिती मिळताच पोलिसांच्या मदतीने छापा टाकून दोन मोठ्या कुंड्यांमध्ये रेती लपवल्याचे आढळून आले. पोलीस बंदोबस्तात कारवाई करत ही रेती पुन्हा खाडीमध्ये लोटण्यात आली. या कारवाईमुळे भिवंडीतील रेतीमाफियांचे धाबे दणाणले आहेत.**

केवणी गावाच्या हद्दीतील खाडीमध्ये मोठ्या प्रमाणावर रेती उपसा सुरू असल्याच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. तहसीलदार अभिजित खोले यांनी त्याची गंभीर दखल घेऊन कारवाईचे आदेश दिले होते. कोपर केवणी येथील ग्राम महसूल अधिकारी, काल्हेरचे अधिकारी मुजीब शेख, वनरक्षक प्रशांत वायाळ यांच्या पथकाने धाव घेऊन रेतीमाफियांच्या गोरखधंद्याचा पर्दाफाश केला. खाडीकिनारा व वनविभागाच्या संरक्षक भिंतीदरम्यान रेतीचा साठा लपवून ठेवण्यासाठी माफियांनी 15 कुंड्या तयार ठेवल्या होत्या. त्यापैकी प्रत्यक्ष दोन कुंड्यांमध्ये रेती होती. महसूलच्या पथकाने शोध घेऊन रेती पकडली आणि ती जवळच्या खाडीमध्ये पुन्हा लोटून दिली.



## वाचक मनोगत

### रल्वेची लेटलतिफी कधी संपणार?

मध्य रेल्वेवर सलग तिसऱ्या दिवशीही तांत्रिक बिघाड झाला. ठाणे - मुलुंडदरम्यान रेल्वे रुळाला तडा गेल्याने लांबपल्ल्याच्या गाड्या विस्कळीत झाल्या. तर, सकाळी काही लोकलवर परिणाम झाला. मध्य रेल्वेच्या वक्तशीरपणात सुधारणा होत नसल्याने प्रवासी प्रचंड संतापले आहेत. परंतु, 'रोज मरे, त्याला कोण रडे' अशी गत झाली आहे. मध्य रेल्वेचा ऑक्टोबर २०२४ मध्ये सरासरी वक्तशीरपणा ९३.१३ टक्के होता, तर ऑक्टोबर २०२५ मध्ये वक्तशीरपणा ९२.५९ टक्क्यांवर घसरला. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवाशांना यावर्षात लोकलच्या विस्कळीत कारभाराला सामोरे जावे लागत आहे. ठाणे - मुलुंडदरम्यान गुरुवारी पहाटे ५१२ वाजता अप दिशेच्या जलद मार्गावरील रेल्वे रुळाला तडा गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेमुळे लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्या रखडल्या. सीएसएमटीचा पुनर्विकास आणि विविध पायाभूत कामांमुळे अनेक रेल्वेगाड्यांचा सीएसएमटी थांबा रद्द केला. त्यामुळे रेल्वेगाड्या दादरपर्यंत चालवण्यात येतात. मात्र रेल्वे रुळाला तडा गेल्याने, दादरपर्यंतही रेल्वेगाड्या वेळेत पोहचल्या नाहीत. हार्बर मार्गावर वडाळा येथे बुधवारी तांत्रिक बिघाड झाल्याने एक मार्गिका अर्धातास बंद होती. दरम्यान मध्य रेल्वेवरील विक्रोळी-कांजूरमार्गदरम्यान मंगळवारीही रेल्वे रुळाला तडा गेल्याने वाहतूक खोळंबली होती. गेल्यावर्षी एप्रिल महिन्यात मध्य रेल्वेचा सरासरी वक्तशीरपणा ९४.८९ टक्के होता. यावर्षी एप्रिलमध्ये सरासरी वक्तशीरपणा ९३.९९ वर घसरला. सरासरी वक्तशीरपणाची मे २०२४ मध्ये ९२.७९ टक्के, तर मे २०२५ मध्ये ९२.५३ टक्के नोंद झाली. गेल्यावर्षी जून आणि जुलै या पावसाच्या कालावधीत मध्य रेल्वेचा खोळंबा झाला. त्यामुळे या दोन महिन्यांत सरासरी वक्तशीरपणा अनुक्रमे ८९.३० टक्के आणि ९१.२५ टक्के होता. परंतु, गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पावसामुळे व्यत्यय कमी आल्याने जून २०२५ मध्ये ९२.५० टक्के आणि जुलै २०२५ मध्ये ९२.१९ टक्के सरासरी वक्तशीरपणाची नोंद झाली. ऑगस्ट २०२४ मध्ये ९३.७३ टक्के आणि ऑगस्ट २०२५ मध्ये ९२.५६ टक्के, सप्टेंबर २०२४ मध्ये ९२.७९ टक्के आणि सप्टेंबर २०२५ मध्ये ९२.५० टक्के, ऑक्टोबर २०२४ मध्ये ९३.१३ टक्के आणि ९२.५९ टक्के सरासरी वक्तशीरपणा नोंदविला. त्यामुळे संपूर्ण आर्थिक वर्षात दोन महिने वगळता वक्तशीरपणा घसरल्याची नोंद आहे.

**विजय मोरे**
बदलापूर

# डोंबिवली रोटरी क्लब तर्फे सर्पमित्रांना विमा संरक्षण

**वन्यजीव संरक्षणाचे काम अतिशय जोखमीचे आणि सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. पर्यावरण संतुलन राखण्याची महत्वाची कामगिरी वन्यजीव मित्र पार पाडतात. हे कर्तव्य पार पाडत असताना अनेक वेळा त्यांना काही आव्हानात्मक परिस्थितीला तोंड द्यावे लागते. अशा परिस्थितीत तातडीचे साहाय्यक म्हणून हे विमा संरक्षण खूप महत्वाचे काम करेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - गाव, खेड्यात, आदिवासी दुर्गम भागात, जंगल पट्टीत जीव धोक्यात घालून वन्यजीवांना (सर्प मित्र) पकडून त्यांना जंगलात सोडून देण्याची कामे वन्यजीव करतात. अनेक वेळा वन्यजीव पकडताना वन्यजीव मित्रांना वन्यजीवांपासून धोका उद्भवण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत वन्यजीवांना तात्काळ वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक ते साहाय्य व्हावे या विचारातून रोटरी क्लब ऑफ डोंबिवलीतर्फे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील दुर्गम भागातील २५ सर्पमित्रांचा प्रत्येकी एक लाखाप्रमाणे २५ लाखाचा विमा काढण्यात आला. आदिवासी, दुर्गम भागात वन्यजीवांसाठी अशाप्रकारचा विमा काढणारा रोटरी क्लब ऑफ डोंबिवली हा पहिला क्लब ठरला आहे.

चार महिन्यापूर्वी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर या क्लबच्या अध्यक्षा स्नेहल शिंदे यांनी आदिवासी, दुर्गम, गाव खेड्यात जीव धोक्यात घालून वन्यजीवांना सुरक्षितपणे पकडून त्यांना जंगलात सोडून देण्याचे काम करणाऱ्या वन्यजीव मित्रांकडे कोणाचे लक्ष नसते. अतिशय आव्हानात्मक सामाजिक सुरक्षेचे काम करणाऱ्या या वन्यजीव मित्रांचा विमा काढण्याचा उपक्रम हा आपण प्राधान्याने राबविणार आहोत, असे जाहीर केले होते. या उपक्रमाबद्दल अध्यक्षा शिंदे यांना रोटरी सदस्यांनी सर्वप्रकारचे साहाय्य करण्याची तयारी दर्शवली होती. ठाणे जिल्ह्यातील विविध भागातील वन्यजीव मित्र यांची माहिती रोटरी क्लबतर्फे संकलित करण्यात आली. या वन्यजीवांशी संपर्क करून त्यांना त्यांचा एक लाखाचा विमा काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या उपक्रमाबद्दल वन्यजीव मित्रांनी समाधान व्यक्त केले.

# 'वाहन तंत्रज्ञ' अभ्यासक्रमांसाठी राज्यातील 45 आयटीआयमध्ये सुसज्ज प्रयोगशाळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील तरुणांना दर्जेदार रोजगाराभिमुख औद्योगिक प्रशिक्षण मिळावे, त्यांना जागतिक रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून राज्यातील ४५ आयटीआयमध्ये 'हलक्या वाहन तंत्रज्ञ' अभ्यासक्रमांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. यामुळे सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख आणि टोयोटा किर्लोस्कर कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विक्रम गुलाठी यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. पुढील पाच वर्षांत कंपनीच्या सहकार्याने राज्यातील ४५ आयटीआय संस्थांमध्ये 'हलके वाहन तंत्रज्ञ अभ्यासक्रमांसाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

# ठाणे पालिका शाळांमध्ये 'थिंक बिग स्पेसेस' डिजिटल शिक्षण उपक्रम सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (20)** - ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग आणि पाय जाम फाउंडेशन यांच्या सहकार्याने अमेझॉनने 'अमेझॉन थिंक बिग स्पेसेस' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. ठाण्यातील सरकारी शाळांमध्ये शाश्वत, सर्वसमावेशक डिजिटल शिक्षण व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमातील पहिले केंद्र येऊर येथील ठाणे महानगरपालिका शाळा क्र. 65 मध्ये सुरू करण्यात आले.

या कार्यक्रमास ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. सचिन सांगळे, अमेझॉन वेब सर्व्हिसेसचे (AWS) संचालक – APAC DCPD कॅमेरॉन इव्हान्स, आणि पाय जॅम फाउंडेशनचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शोएब दार या प्रमुख मान्यवरांसह शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.




शिक्षक-नेतृत्वाखालील अमेझॉन थिंक बिग स्पेसेस आणि स्टेम कॉर्नर्स हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवावर आधारित, संगणकाच्या माध्यमातून शिकवण्यावर भर देणारे आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या नऊ शाळांमधील 900 हून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार असून विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक कौशल्य वाढविण्यासाठी अभ्यासक्रमात संगणकीय विचारशक्ती आणि अभिनव विचारप्रक्रिया समाविष्ट करण्यात आले असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव मिळणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक समस्या ओळखता येतील आणि तंत्रज्ञान-आधारित उपाययोजना करता येतील. पायाभूत सुविधांसोबतच शिक्षकांच्या कौशल्यवृद्धीलाही या उपक्रमात महत्त्व देण्यात आले आहे. ICT आणि इतर विषयांतील २५० शिक्षकांना संगणक विज्ञान व कोडिंगचे सर्वसमावेशक प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**या माध्यमातून एकूण ७,५०० विद्यार्थ्यांपर्यंत सकारात्मक परिणाम पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. २०१९ मध्ये सुरू झालेल्या 'अमेझॉन थिंक बिग प्रोग्राम' मधून नवी मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महानगरपालिकेतील ५५ शासकीय शाळांमध्ये सुरु असलेल्या 'अमेझॉन थिंक बिग स्पेसेस' आणि कॉर्नर्सद्वारे १२,००० विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे..**

# खर्डी : जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांना पीएच.डी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप महाविद्यालय खर्डीचे प्र.प्राचार्य प्रा कैलास कळकटे यांना नुकतीच मराठी विषयात पीएच.डी ही पदवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने प्रदान करण्यात आली आहे. डॉ. कळकटे यांनी मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. सतीश बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथेतील



स्थित्यंतरे' या विषयावर शोध प्रबंध सादर केला. या शोध प्रबंधास विद्यापीठाने मान्यता देत पीएचडी ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्रदान केली आहे. डॉ. कळकटे यांच्या या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे, प्राचार्य अशोक वाघ, श्री अनिल घोडविंदे, नरेश जाधव, श्री भगवान मोकाशी, श्री प्रशांत खर्डीकर, श्री लवेश वाघ, महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

# सुसंस्काराच्या गुंत्यात अडकलेली भावनिक नात्यांची गुंफण




**महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय तर्फे नोव्हेंबर संपन्न होत असलेल्या 'हौशी राज्य नाट्य स्पर्धेत १९ नोव्हेंबर रोजी, कोकण मराठी साहित्य परिषद, अंबरनाथ शाखा तर्फे कल्याणच्या आचार्य अत्रे रंग मंदिरात 'चामखीळ' ह्या दोन अंकी नाटकाचा प्रयोग सादर झाला. स्त्री पुरुष संबंध आणि विवाहसंस्था अशा संवेदनशिल विषयाला हात घालणारी नाटकं दुर्मिळ आणि त्यावर लिहिणे हे तर त्याहूनही पलिकडे! त्यामुळे चामखीळच्या माध्यामातून नाटककाराने अतिषय उत्कृष्ट दर्जाच्या सामाजिक नाटकाचे 'रानफूल' रंगदेवतेच्या ओटीत समर्पित केल्याबाद्दल लेखकाचे आणि पर्यायाने कोकण मराठी साहित्य परिषद, अंबरनाथ शाखेचे आभार.**

---------------------------

खरंतर चामखीळ म्हणजे शरीरावर आलेल्या अतिरिक्त मांसाचा गोळा. त्याचा आपल्याला तसा फारसा त्रास होत नाही; पण त्यामुळे विद्रूपता येते. अंगावर अनिच्छेने उगवलेला तो निरुपयोगी मांसल भाग निघून जावा म्हणून आपण अनेक उपाय करत राहतो; तो निघणं तर दूरच पण काढून टाकण्याचा जास्तच हट्ट केला तर त्यातून प्रसंगी रक्तही येतं. सुंदरतेला कुरुपतेचा डाग लावणारा तो भाग लपूनही रहात नाही त्यामुळे वारंवार आपले आणि इतरांचं त्याकडे लक्ष जाते. विवाह संस्थेतल्या नात्यात असे एखादे चामखीळ उगवण्याची शक्यता असतेच. स्त्री पुरुष संबंध आणि विवाहसंस्था हा या नाटकाचा विषय असून किरण येले यांनी तो आपल्या लेखणीतून शब्दबद्ध केला आहे. आजच्या काळात महामार्गाच्या कडेने वाढत चाललेल्या लॉज, हॉटेलची संख्या आपण पाहत आहोत. या ठिकाणी तासांच्या करारावर जाणारी जोडपी (त्यात प्रौढ आणि विवाह झालेली अधिक) आपण पाहतो. हे सारे स्त्री पुरुष असंस्कृत असतात का? आपण आपल्या जोडीदाराला धोका देत आहोत, त्यांच्याशी अप्रामाणिक राहत आहोत याचा सल त्यांच्या मनात असतो पण तरीही मग ही माणसे का जातात विवाह संस्थेने आखून दिलेल्या चौकटीबाहेर? आजच्या घडीला भारतीय समाज आणि संस्कृतीला आव्हान देणाऱ्या, या प्रश्नाचे (विवाहबाह्य संबंधांचे कारण) उत्तर, विनोदांच्या अंगाने शोधण्याचा प्रयत्न म्हणजे हे दोन अंकी नाटक 'चामखीळ'.

या नाटकातील अविवाहित नायकाला त्यांच्या कॉलेजकाळातील एक मैत्रीण (जी विवाहित आहे) घरी बोलवते आणि त्यासोबत प्रणय करते. त्यानंतर नायक तिच्या प्रेमात पडतो पण ती मैत्रीण त्याला समजावते की हे संबंध कॅज्यूअल आहेत. त्यात प्रेम नाही. आणि नायकाला प्रश्न पडतो की अशा संबंधात प्रेम नसू कसे शकते? असे संबंध कॅज्यूअल असू शकतात का? मैत्रीण या प्रश्नाचे उत्तर त्यांचे त्याला शोधयला सांगते आणि मग त्याची भेट एका देहविक्री करणाऱ्या वारांगनेशी होते जिला रोजच असे संबंध ठेवावे लागतात आणि मग ती वेश्या त्याला समजावते की त्याच्या मैत्रिणीला असे संबंध का ठेवावे लागले. त्या संबंधाना ती कॅज्यूअल का म्हणते. आणि समाजात असे संबंध का आहेत? या प्रश्नांचा ठाव घेणारी उत्कृष्ठ कलाकृती म्हणजे चामखीळ !

अरुण, मंदार, मनवा आणि अभिनयात कुठेही नसलेली मालती या चार पात्रांमध्ये (खरंतर तीनच पात्रांत) संपूर्ण नाटक बसवण्यात आलं आहे संतोष गोरे यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केलं असून दिग्दर्शनावर त्यांनी किती मेहनत घेतली आहे; हे दिसून येतं!


अरुण हा या कथेतील मुख्य नायक असून शिवराम गावडे यांनी त्याची भूमिका साकार केली आहे. गोरल पोहाणे हिने मनवा आणि सईदा अशा दोन विभिन्न भूमिका केल्या आहेत. या मुख्य दोन कलाकारांवर अवलंबून असलेल्या या संपूर्ण कथानकाला प्रफुल्ल कोदे यांनी अरुणचा जिवलग मित्र मंदार , शहिदाचा नवरा अस्लम, दिग्दर्शक आणि वेटर अशा चौरंगी भूमिका करून मुख्य कलाकारांच्या भूमिकांना वेटेज दिलं आहे. खरं तर चामखीळ मध्ये जीवंतपणा आणण्याचं काम जरी या दोन मुख्य कलाकारांनी केलं असलं तरी प्रफुल्ल कोदे यांच्या व्हर्सटाईल अभिनयाने दोन्ही कलाकारांना दिलेली साथ त्याच्यासाठी खूपच आव्हानात्मक होती. त्यामुळे कोणताही प्रयोग यशस्वी होण्यासाठी कलाकाराबरोबरच सहकलाकाराचेही कौतुक केलेच पाहिजे आणि प्रफुल्ल कोदे यांनी आपल्या अभिनय कौशल्यातून या कौतुकावर आपला हक्क सिद्ध केल्याचे म्हणता येईल.

कोणताही अधिक 'बोल्डनेस' न करता अत्यंत साधी सोबर आणि सोपी वेशभूषा वापरुन दर्जेदार निर्मिती केल्याबद्दल दिग्दर्शक, निर्माता यांसह रंगभूषाकार अभय शिंदे, वेशभूषाकार शुभांगी ठोसर हे देखील कौतुकास पात्र आहेत. खरंतर वेशभूषा जितकी साधी तितकं ते नाटक जवळचं वाटतं, असा प्रेक्षकांचा अनुभव आहे.

ह्या नाटकाचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची साधी सोपी ओझरती भाषा! नाट्य रसिकांना संगीताची आवड असते हे देखील नाटककारांनी हेरून मध्येच त्याला संगीताची आणि नृत्याची जोड दिली आहे. आधीच सांगितल्याप्रमाणे

**लेखक :** किरण येले
**दिग्दर्शन :** संतोष गोरे
**प्रकाश योजना :** साई शिर्सेकर
**नेपथ्य :** गणेश कारिते, अमित सोमवंशी
**संगीत :** दिवाकर तोरणे
**रंगभूषा :** अभय शिंदे
**वेशभूषा :** शुभांगी ठोसर
**नृत्य दिग्दर्शन :** स्वाती सन्मुख जोशी

**पात्र परिचय**
**शिवराम गावडे :** अरुण
**गोरल पोहाणे :** मनवा आणि सैईदा
**प्रफुल्ल कोदे :** मंदार, दिग्दर्शक, अस्लम, वेटर






प्रफुल्ल कोदे　गोरल पोहाणे　शिवराम गावडे

नाटकाचा विषय स्त्री पुरुष संबंध आणि विवाह संस्थांवर आधारित असला तरी उत्तरार्धात हा विषय कुंटणखाण्याकडे कसा सरकतो, हे या नाटकाचं गुढ आहे. अशा प्रकारचे कथानक असलेल्या नाटकात "मोहे रंग दो लाल" या गीतावर नृत्याची हलकी जोड देऊन त्याला नृत्य आणि संगीतालंकृत करणे म्हणजे श्रोत्यांना अनपेक्षितपणे दिलेला आल्हाद धक्काच म्हणावा लागेल. नृत्य, संगीत, विनोद, द्वेष, प्रेम मोह, क्रोध अशा विविध छटांनी या नाटकात सप्तरंग भरले आहेत. समाजातील वाईट आणि चुकीच्या रूढी, पुरुषप्रधान संस्कृती आणि परंपरांवर जबरदस्त आसूड ओढण्याचं काम लेखकांना आपल्या लेखणीतून केलं आहे. शिवाय त्याला विनोदाची झालर देखील असल्याने असे कडवट विषय पचण्यास सोपे जातात आणि ते पचनीही पडतात!

सती-सावित्रीच्या आपण शपथा घेत आलो, त्यांची उदाहरणं देत आलो मात्र खरी सती-सावित्री कोण यावर लेखकांनं चपखल उदाहरणे देऊन श्रद्धा अंधश्रद्धा, बळी आणि मांससेवन अशा मुद्द्यांना निसटता स्पर्श करून आपला विषय अगदी पाच ते सात मिनिटात समजावून सांगितला आहे, आणि तोही विनोदबुद्धीने आणि सर्वांना पटण्यासारखा; हे विशेष!

नाटकाची कथा ऐकताना किंवा नाटक पाहताना ते तुम्हाला साधं सोपं वाटेल पण मुळात हे नाटक अत्यंत सूक्ष्म आहे, हे आवर्जून सांगावं लागेल त्यामुळे या नाटकाचा विषय अतिशय अथांग आहे आणि त्याचा जिवंत अनुभव घेण्यावाचून प्रेक्षकांना पर्याय नाही; हे त्रिवार सत्य. हे नाटक सगळ्याच अंगांनी उजवं असलं तरी नेपथ्यकार गणेश कारिते आणि अमित सोमवंशी यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी उभारलेला 'आय लव पतंग'चा सेट अनेक प्रेक्षकांच्या मनात घर करून गेला. सई शिरसेकर यांची प्रकाशयोजना दिवाकर तोरणे यांचे संगीत, अभय शिंदेंची रंगभूषा आणि स्वाती सन्मुख जोशी यांचे नृत्य दिग्दर्शन यांनी या नाटकात प्राण फुंकले आहेत. नेपथ्य आणि कथा जितकी सुंदर आहे तितकच या नाटकाची प्रकाश योजनाही सरस आहे.

नाटकाबद्दल बोलताना गोरल पोहणे यांच्या भूमिकेबद्दल थोडं सांगायचं राहूनच गेलं, अरुण ची मैत्रीण आणि वेशालयातील सईदा अशा दोन भूमिका गोरल पोहणे यांनी साकारले आहेत मुळात वारांगनेची भूमिका करणं हे खूप कठीण असतं आणि त्यासाठी सहसा कोणी तयार होत नाही मात्र गोरल यांनी कोणतंही बंधन आणि दडपण न ठेवता सईदाच्या भूमिकेला जबरदस्त न्याय दिला आहे.

कुंटणखान्यात आलेल्या मराठी बोलणाऱ्या गिऱ्हाईकाला "तू मनसे वाला है क्या रे" ? असा थेट सवाल करून गोरल यांनी सबंध पेक्षागृहाच्या टाळ्यांची मोट आपल्या पदरात बांधली. अर्थात त्यांच्या या वाक्यावरून प्रेक्षागृहात हशा पिकतो ! हे कथानक पिकलेल्या हशावर थांबले असते तर एकवेळ हरकत नव्हती; मात्र त्यांच्या या वाक्यावर खच्चून भरलेल्या प्रेक्षागृहातून टाळया येणं हे मराठी आणि त्यासाठी काम करणाऱ्या कथीत राजकीय पक्षाप्रती असलेल्या लोकप्रीयतेचं प्रतीक म्हणावं लागेल का? अर्थात याचा कोणत्याही राजकीय पक्षाशी कोणताही संबंध नसला तरी प्रेक्षागृहात जे घडलं ते व्यक्त करणं क्रमप्राप्त !

**संस्काराच्या चौकटीत अडकलेली भावनिक नात्यांची गुंफण अनुभवण्यासाठी प्रेक्षकांनी चामखीळचा प्रयोग आवर्जून पहावा. कोणतेही भडक संवाद न वापरता हलक्या संवादांचा वापर करून कथानक फुलवण्याचा अतिशय सुंदर प्रयत्न झाला आहे. या नाटकात पतंगावरून सुरू होणारी कथा पतंगावरच येऊन विसावते. पतंगाच्या रीलचा सांगाडा जसा मांजाच्या असंख्य आवरणांनी दिसेनासा होतो अगदी तसंच माणसाच्या मनावरही मैत्री, प्रेम, मोह, संबंध, नैतिक आणि अनैतिकतेच्या भावनिक गुंत्याची वेष्टने असतात. समाजात आपण नानाविध मुखवटे घालून फिरत असतो त्यामुळे त्यांचा खरा चेहरा दिसून येत नाही अगदी त्या पतंगाच्या रीळ प्रमाणे! त्यामुळेच "मला पतंग आणि त्याचा मांजा उंच आकाशात उडताना रीलचा मोकळा सांगाडा पाहायचा आहे रे!" हे नायकाचं वाक्य याचंच द्योतक म्हणावं लागेल आणि ते खरंही आहे; कारण मनाच्या अंतःरंगाचा सांगाडा पाहायचा असेल तर त्यावरील भावनिक गुंतांची, खोट्या मुखवट्यांची रीळ उंच आकाशात मोकळी केली पाहिजे, हे निर्विवाद सत्य आहे, काहीसं असंच सांगण्याचा प्रयत्न लेखकांनं केला आहे. ज्या ज्या ठिकाणी कथानक गंभीर होते तिथे अधून मधून विनोदाचे चिमटे प्रभावीपणे काढण्यात आले, त्यामुळे लेखकाचं आणि दिग्दर्शकाचं आत्मभान किती जागृत आहे हे दिसून येतं. अर्थात पटकथेचा विषय अतिशय संवेदनशील आणि खोलात जाणारा असल्यामुळे शिवाय त्याने समाजावर आसूड ओढल्याने 'चामखीळ' समजून घेण्यासाठी प्रेक्षकही 'सुज्ञ' आणि 'सूक्ष्म' असावा.**

## भविष्यवेध



शुक्रवार
21 नोव्हेंबर 2025

**मेष**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**वृषभ**
योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.

**मिथुन**
व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

**कर्क**
विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**सिंह**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**कन्या**
धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थींच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**तुळ**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**वृश्चिक**
सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.

**धनु**
सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**मकर**
आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**कुंभ**
नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**मिन**
धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.



# राज्यातील महापालिकांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी वित्त आयोगाची बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (20) : महापालिकांच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना मूलभूत सेवा सुविधा पुरविल्या जातात तसेच दूरगामी प्रकल्प राबविण्यात येतात, यासाठीचा येणारा खर्च महापालिका विविध कर रुपी उत्पन्नातून करत असते. महापालिकेला मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ होवून अधिक प्रभावीपणे सेवा सुविधा पुरविण्यात याव्यात व सद्यस्थितीत राज्यातील महापालिकांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेवून उत्पन्न वाढीच्या दृष्टीने शासनाच्या माध्यमातून निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करण्याच्या सूचना आज झालेल्या बैठकीत 6 व्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष नितीन करीर यांनी केल्या.**

ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे आज 6 व्या महाराष्ट्र वित्त आयोगाची बैठक पार पडली. आयोगाचे अध्यक्ष नितीन करीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस अप्पर मुख्य सचिव गोविंद राज, नगरप्रशासन संचलनालय आयुक्त अभिषेक कृष्णा, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह राज्यातील विविध महापालिकांचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने फेब्रुवारी 2025 मध्ये सहाव्या वित्त आयोगाची स्थापना केली असून या आयोगाच्या माध्यमातून निश्चित केलेल्या कामानुसार



**6 व्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष नितीन करीर यांचे स्वागत करताना महापालिका आयुक्त सौरभ राव**

महापालिकांमधील आर्थिक स्त्रोत कशा प्रकारे वाढविता येईल याबाबत राज्यातील विविध महापालिकांच्या आयुक्तांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सद्यस्थितीतील सुरू असलेल्या उत्पन्नाच्या स्त्रोताची माहिती सर्व आयुक्तांनी सादर केली. यामध्ये उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण अधिक असल्याची बाब प्रामुख्याने निदर्शनास आली, यावर नियंत्रण ठेवावे व सर्व महापालिकांनी बचत कशी करता येईल या दृष्टीने नियोजन करावे अशा सूचना दिल्या. सद्यस्थितीत महापालिकांच्या माध्यमातून मालमत्ता कर, व्यावसायिक कर, परवाना शुल्क आदीमध्ये सुधारणा करण्यात यावी तसेच महाराष्ट्र शासनाकडून मिळणारे अनुदान विहीत मुदतीत मिळावे या दृष्टीने पाठपुरावा करावा असेही नमूद केले.

मालमत्ता कर, पाणीपुरवठा कर यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, याबाबत पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवून निर्णय घेण्यात यावा, जेणेकरुन वाढीव कराला नागरिकांकडून विरोध होणार नाही. तसेच नवीन बांधकामासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबतही निर्णय घेण्यात यावा. जेणेकरुन महापालिकांना वाढीव उत्पन्न मिळू शकते. तसेच शासनाकडून आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्क शासनाकडून जमा होवून नंतर ते महापालिकांनावितरीत करण्यात येते, यावर धोरणात्मक निर्णय घेवून मुंद्राक शुल्क नोदंणीच्या वेळेसच निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार शुल्क थेट महापालिकेकडे जमा करण्यात यावे अशी मागणी विविध महापालिकांच्या आयुक्तांनी यावेळी केली. तसेच महानगरपालिकांमधून उत्पन्न वाढीसाठी ज्या काही सूचना असतील त्या लेखी स्वरुपात महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाकडे पाठविण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. तसेच प्रशासकीय कामामध्ये शिस्त राखण्याचे निर्देशही त्यांनी सर्व महापालिकांना दिले.

या बैठकीत ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी राज्य वित्त आयोगाच्या माध्यमातून आवश्यक ती मदतमिळण्याबाबत महत्वपूर्ण विषयांबाबत चर्चा केली. यामध्ये शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर, निवासी जागेवरील कर, मुद्रांक शुल्क, औषधे व खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या आस्थापनांना महापालिकेमार्फत परवाने वितरीत करणे, सर्व दुकाने व आस्थापनांच्या नोंदी व नुतनीकरण आदीपासून प्राप्त होणारे शुल्क, रोडटॅक्स आदीमार्फत मिळणारे उत्पन्न महापालिकांना वर्ग करणे आदींबाबत मागणी या बैठकीत केली. तसेच शासन दरबारी प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

महापालिकेने आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प तयार करत असताना जमा खर्चाचा योग्य ताळमेळ करुन वस्तुनिष्ठ अर्थसंकल्प तयार करावा जेणेकरुन खर्चामध्ये बचत होवून महानगरपालिकेवर आर्थिक भार पडणार नाही या दृष्टीकोनातून नियोजन करावे अशा सूचना देखील अध्यक्ष नितीन करीर यांनी यावेळी दिल्या.

### कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर

## संघटन मजबूतीवर शिंदे गटाचं लक्ष

### कल्याण पूर्वेमध्ये शेकडो नवीन पद नियुक्त्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २० :** कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाने आपले संघटन मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. याचाच भाग म्हणून, बुधवारी (ता. १९) सायंकाळी पदाधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन कल्याण पूर्वेमध्ये शेकडो नवीन पद नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत एकूण शेकडो पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यात विशेषतः शिवसेना महिला आघाडीच्या सुमारे ७०० पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. मोठ्या संख्येने महिला पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न शिंदे गटाकडून करण्यात आला आहे.

जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांनी या नियुक्त्यांबद्दल स्पष्टीकरण दिले की, पूर्वी काही पदाधिकाऱ्यांची नियुक्ती झाली होती, परंतु काही जण अनुपस्थित होते. तसेच, नवीन पॅनेल पद्धतीमुळे झालेल्या वाढीनुसार आज कल्याण पूर्वेत पदांचे वाटप करण्यात आले आहे. लांडगे यांनी आगामी महानगरपालिका निवडणुकीत विजयाचा दावा केला आहे. ते म्हणाले की, कार्यकर्ते नेहमीच काम करत असतात आणि निवडणूक जाहीर झाल्याने सर्वजण जोमाने कामाला लागले आहेत.

निवडणुकीत निश्चितपणे आधीपेक्षा जास्त जागा निवडून येतील, असा मला विश्वास आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात अनेक विकासकामे प्रगतिपथावर आहेत. लोकांना विकास हवा आहे. त्यामुळे शिवसेनेला यश मिळेल, असे मत लांडगे यांनी व्यक्त केले.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना पक्षप्रवेश देऊन भाजपने ऑपरेशन लोटस राबवले. मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये यानंतर महायुतीतील अंतर्गत पक्षामध्ये फूट पाडायची नाही असे ठरले आहे. मात्र तरीही कल्याणमध्ये शिवसेना शिंदे गटाचे काही पदाधिकारी माजी नगरसेवक भाजपमध्ये जाणार असल्याची जोरदार चर्चा समाज माध्यमांवर सुरू होती. यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे मल्लेश शेट्टी यांचे कार्यकर्ते आणि नवीन गवळी यांचे कार्यकर्ते यांनी या सर्व चर्चा निरर्थक असल्याचा दावा केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी विश्वास दाखवून संघटन वाढीची जबाबदारी दिली आहे. असे असताना पक्ष सोडून भाजपामध्ये जाण्याचा प्रश्नच येत नसून कल्याण मध्ये शिवसेना शिंदे गटाचा गड मजबूत असल्याचा दावा करण्यात येत आहे.

## क्लस्टर योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालिकेने उचलली पाऊले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे -** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या समुह पुनर्विकास (क्लस्टर) योजनेंतर्गत किसननगर भागात इमारती उभारणीचे काम काही वर्षांपुर्वी सुरू झाले असून त्यापाठोपाठ आता ठाण्यातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या द्रुतगती महामार्गालगतच्या आनंदनगरमध्ये क्लस्टर योजना राबविण्यात येणार आहे. त्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिल्याने याठिकाणी क्लस्टरचे इमले उभे राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच राबोडी, गोकुळनगर, किसनगर, लोकमान्यनगर, दिवा, साबेगाव, कोपरी आणि हाजुरी अशा सात भागात क्लस्टर योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी पालिकेने पाऊले उचलली आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत इमारती, अनधिकृत चाळी आणि झोपडपट्ट्यांचा एकत्रित पुनर्विकास करण्यासाठी समुह पुनर्विकास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी ठाणे महापालिकेने एकूण ५० नागरी पुनरुत्थान आराखडे (युआरपी) तयार केले आहेत. या आराखड्यांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

किसनगर भागात सिडकोच्या मदतनीने समुह पुनर्विकास योजना राबविण्यात येत असून याठिकाणी मोकळया जागांवर इमारती उभारणीचे काम सुरू आहे. तर, टेकडी बंगला, हाजूरी आणि किसननगरमधील इतर आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी महात्मा फुले नूतन ऊर्जा आणि पायाभूत सुविधा तंत्रज्ञान लिमिटेड (महाप्रीत) या शासन संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्यास नगरविकास विभागाने यापुर्वीच मान्यता दिली आहे. किसननगर भागाचा सविस्तर प्रकल्प आराखडा महाप्रीतने तयार केला होता. त्यानंतर त्यांना हेतू पत्र देऊन त्यांच्यासोबत पालिकेने करार केला होता.

## पॅनेल पद्धतीने होणाऱ्या निवडणूकीमुळे गोंधळ ? प्रशासनाकडून मार्गदर्शनाची मागणी


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. २०**

१० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असला, तरी या निवडणुकीपूर्वीच शहराच्या प्रभागरचना आणि पॅनेल प्रणालीबाबत चर्चेचा आणि गोंधळाचा माहोल निर्माण झाला आहे. प्रारूप प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर भाजपकडून या प्रभागरचनेवर तीव्र आक्षेप नोंदवण्यात आला होता. प्रारूप प्रभाग आराखडा तयार करताना शासनाने शिंदे गटाच्या दबावाखाली निर्णय घेतल्याची चर्चा त्या वेळी रंगली होती. यासंदर्भातील तक्रारी निवडणूक आयोगाने नेमलेल्या अधिकाऱ्यांकडे आणि पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे दाखल झाल्या होत्या. त्यावर झालेल्या सुनावणीनंतर अखेर अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध करण्यात आली आणि निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला.

२०१५ मध्ये झालेली बदलापूर पालिकेची शेवटची निवडणूक नागरिकांना अजूनही आठवते. त्यानंतर २०२० मध्ये निवडणूक होणे अपेक्षित होते, परंतु कोविड महामारीमुळे ती पाच वर्षे पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे तब्बल १० वर्षांच्या अंतरानंतर होणाऱ्या या निवडणुकांकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. २०१५ च्या निवडणुकीत बदलापूर पालिकेचे एकूण ४७ प्रभाग होते, मात्र यंदाच्या २०२५ च्या निवडणुकीत दोन प्रभागांची वाढ होऊन एकूण ४९ प्रभागांमध्ये निवडणूक होणार आहे. त्यात यंदाच्या निवडणुकीत सर्वात मोठा बदल म्हणजे, पॅनेल पद्धतीची अंमलबजावणी करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने या वेळेस प्रत्येक दोन प्रभागांचा एक पॅनेल तयार केला आहे, तर शेवटचा पॅनेल तीन प्रभागांचा असणार आहे. त्यामुळे एकूण २४ पॅनेलमध्ये निवडणुका होणार आहेत.

या नव्या प्रणालीमुळे मतदारांना काही प्रमाणात गोंधळ वाटत आहे. प्रत्येक पॅनेलमध्ये दोन उमेदवार असल्याने मतदारांना नगरसेवकपदासाठी दोन उमेदवारांना मतदान करावे लागणार, तर नगराध्यक्षपदासाठी एक मत द्यावे लागेल. त्यामुळे एकूण तीन वेळा मतदान करण्याची प्रक्रिया असेल, मात्र विशेष बाब म्हणजे पॅनेल क्रमांक १५ मध्ये तीन प्रभागांचा समावेश असल्याने त्या ठिकाणी तीन नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष अशा चार वेळा मतदान करावे लागणार आहे. या बदललेल्या मतदान पद्धतीमुळे अनेक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे पॅनेल पद्धतीबाबत स्पष्ट मार्गदर्शन आणि माहितीपत्रिका प्रत्येक मतदारापर्यंत प्रशासनाने व निवडणूक आयोगाने पोहोचवावी. मतदानाच्या दिवशी गोंधळ उडू नये व मतदारांचा संभ्रम दूर व्हावा यासाठी प्रशासनाकडून ही दखल घेणे गरजेचे असल्याचे, अनेक जाणकारांचे मत आहे. त्याचप्रमाणे राजकीय विश्लेषकांच्या मते, नवीन पॅनेल प्रणाली, वाढलेले प्रभाग आणि थेट नगराध्यक्ष निवडणूक या सर्व गोष्टींमुळे यंदाची निवडणूक बदलापूरसाठी ऐतिहासिक ठरणार आहे, मात्र मतदारांनी मतदानाच्या प्रक्रियेबद्दल योग्य माहिती घेतल्यासच लोकशाहीचा उत्सव सुरळीत पार पडेल.




## टिटवाळ्यातील कलात्मक प्रतिभेला जागतिक स्तरावरही मान्यता

### अदिती दीक्षित हिच्या कलाकृतींचे इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअरमध्ये कौतुक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा, ता. २०**

टिटवाळयातील कलात्मक प्रतिभेला आता जागतिक स्तरावरही मान्यता मिळू लागली आहे. स्थानिक कलाकार अदिती दीक्षित हिच्या कलाकृतींचे इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअरमध्ये कौतुक करण्यात आले आहे. तिच्या यशामुळे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय टिटवाळा शहराची ओळख अधिक भक्कम होत आहे.

प्रगती मैदानावर प्रतिष्ठित आयआयटीएफ मेळा सुरू आहे. यामध्ये वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या हॅंडीक्राफ्ट विभागाकडून टिटवाळयातील कलाकार अदिती दीक्षितच्या स्टुडिओ विरासत या स्टार्टअपची निवड करण्यात आली आहे. या प्रदर्शनात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अदितीच्या स्टॉलला भेट देऊन तिच्या टीमच्या कामाचे मनापासून कौतुक केले. यामध्ये दिल्ली आयकर विभागाचे डेप्युटी कमिशनर डॉ. श्रीधर, हॅंडीक्राफ्ट विभागाच्या डेवलपमेंट कमिशनर अम्रीत राज आणि हॅंडलूम विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे. दिल्लीकरांनीही अदितीच्या हॅंडक्राफ्ट डिझाइन्सला भरभरून प्रतिसाद दिला.

दीक्षित कुटुंबाचा कलेचा तेजोमेघ

दीक्षित कुटुंबाने मागील काही महिन्यांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कलेचा तेजोमेघ पसरवला आहे. मागील वर्षी डिसेंबर महिन्यात स्पंदन ग्रुपतर्फे मुंबईतील हॉटेल ताजमहल पॅलेस येथे आयोजित केलेल्या कला प्रदर्शनीत माधव दीक्षित यांच्या चित्रांची प्रदर्शन लावण्यात आले होते. त्यांच्या काही पेंटिंग्जना विशेष दाद मिळाली असून, त्यापैकी एक युकेमधील कुटुंबाने खरेदी केले. त्यांच्या कलाकृतींसाठी नुकतेच ताजमहाल पॅलेस येथे स्पंदन ग्रुपने माधव दीक्षित यांना कला क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करत गौरव केला.

**अदितीचा आंतरराष्ट्रीय गौरव याच सोहळयात माधव दीक्षित यांची कन्या अदिती दीक्षित हिलाही आंतरराष्ट्रीय पातळीवरील गौरव प्राप्त झाला. ग्रीस येथील एका प्रदर्शनात तिच्या सिरेमिक कलाकृतींचे विशेष कौतुक झाले. यानंतर तिच्या वस्तू इटली, स्पेन, फ्रान्स व स्वित्झर्लंड या देशांतील प्रदर्शनांसाठी निवडल्या गेल्या. या पार्श्वभूमीवर अदितीला कला क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय युवा आयकॉन पुरस्कार प्रदान केला.**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, अनुभवी निविदाकारांकडुन “संरक्षक भिंत बांधणे” लेखाशिर्षकांतर्गत वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र.१६ मधील रस्ता क्र.२७ व २८ येथे कचरा टाकी करिता संरक्षक भिंत बांधणे या कामाकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथे दि.२४.११.२०२५ ते दि.०१.१२.२०२५ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.०१.१२.२०२५ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.०२.१२.२०२५ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी - वा.प्र.स/ ९०२/२०२५-२६ सही/-
दि:२०.११.२०२५ कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

# हेल्मेटच्या वापरासाठी जनजागृती आवश्यक -जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

### ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात ‘हेल्मेट मॅन ऑफ इंडिया’ यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.20 :** रस्ते अपघातांत मृत्यू पावणाऱ्यांमध्ये तरुणांचा वाढता सहभाग चिंताजनक असून त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी हेल्मेट वापराविषयी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. ठाणे जिल्हाधिकारी आवारातील जिल्हा नियोजन भवनातील सभागृहात चित्रमेध व्हिजन आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, पोलीस विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्मेट वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला ‘हेल्मेट मॅन ऑफ इंडिया’ म्हणून परिचित असलेले श्री. राघवेंद्र कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, भिवंडी महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर, लेफ्टनंट कर्नल विवेक तिवारी, आयटी तज्ञ पवन द्विवेदी, लेफ्टनंट कर्नल मोहित गौर (निवृत्त), जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, चित्रमेध व्हिजनचे



आयोजक बबन लाटे व विशाल लाटे यांच्यासह मोठ्या संख्येने ठाणे पोलीस स्कूलचे प्राथमिक विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

या उपक्रमाचे कौतुक करताना जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले, “ठाण्यात लहान मुलांना हेल्मेट वाटपाचा असा उपक्रम प्रथमच राबविला जात आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. सर्वसाधारणपणे 18 वर्षांनंतर वाहन चालविण्यास पात्र झाल्यावर तरुणांमध्ये हेल्मेटचा वापर वाढतो. परंतु राघवेंद्र कुमार यांनी मांडलेली ‘लहानपणापासून हेल्मेटची सवय’ ही संकल्पना मुलांमध्ये सुरक्षिततेची जाण निर्माण करणारी आहे. आज मुलांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर भविष्यात ते स्वतः हेल्मेटचा योग्य वापर करतील आणि समाजातही त्याचा प्रसार करतील.”

रस्ते अपघातातील मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर असून हेल्मेटचाच वापर हे त्यावरील सर्वात सोपे व प्रभावी उपाय आहे, असेही त्यांनी नमूद केले. तसेच राघवेंद्र कुमार यांच्या २ लाख हेल्मेट वितरण मोहिमेची प्रशंसा करत त्यांना शुभेच्छाही दिल्या.

कार्यक्रमात हेल्मेट घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घरी गेल्यावर आपल्या पालकांना आणि नातेवाईकांना हेल्मेट न घालण्याचे धोके आणि वापराचे महत्त्व समजावून सांगावे, तसेच विनाहेल्मेट दिसणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना केले.

राघवेंद्र कुमार यांनी या उपक्रमाचा उगम कसा झाला, तसेच हेल्मेट वापराचा प्रसार करण्यामागील अनुभव सांगितला. ते म्हणाले, “लहानपणापासून मुलांना हेल्मेटची सवय लावली, तर ते मोठे झाल्यावर कोणतेही वाहन कधीच विनाहेल्मेट चालवणार नाहीत. त्यामुळे भविष्यातील अपघाती मृत्यूचे प्रमाण निश्चितच कमी होईल.” या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी वीर शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या जीवनावरील प्रसंगावर देशप्रेमावर आधारित एकपात्री एकांकिका सादर केली. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना देशभक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांना प्रतिकात्मकरित्या हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक पटकविलेल्या शौर्या अंबुरे या विद्यार्थीनीचा जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# कोकण विभागीय आयुक्त कार्यालयासमोर 'ऑफ्रोह'चे धरणा आंदोलन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : अधिसंख्य कर्मचा-यांच्या व अन्यायग्रस्त आदिवासींच्या न्याय हक्कासाठी लढणा-या ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन महाराष्ट्र (ऑफ्रोह) च्या वतीने महाराष्ट्रातील नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजी नगर, पुणे, कोकण भवन नवीमुंबई, नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयावर एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात आले. अनुसूचित जमातीवर नियुक्त झालेल्या व सेवा संरक्षण असलेल्या कर्मचारी यांना नियमबाह्य पद्धतीने अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी-कर्मचा-यांच्या दिर्घ काळ प्रलंबित असलेल्या विविध मागण्या पूर्ण करणे ,या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. कोकण विभागीय विभागीय आयुक्त कार्यालय येथील या आंदोलनात ऑफ्रोह चे राज्य प्रसिध्दीप्रमुख गजेंद्र पौनीकर जगताप, कोकण विभागीय अध्यक्ष जलदिप तांडेल, ठाणे माजी जिल्हाध्यक्ष दयानंद कोळी, रायगड जिल्हाध्यक्ष मोरेश्वर हाडके, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष किशोर रोडे, रायगड महिला आघाडी जिल्हाध्यक्ष राजश्री बंदरी, ठाणे उपाध्यक्ष अजय कोळी, प्रकाश कोळी, कोषाध्यक्ष महेश लिमजे, पांडुरंग नंदनवार, रवींद्र निमगावकर यांच्यासह ऑफ्रोह सभासद व ऑफ्रोह महिला आघाडीचें अनेक पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. ऑफ्रोह च्या विविध मागण्याचे निवेदन विभागीय आयुक्त याच्या वतीने उपायुक्त (सामान्य प्रशासन ) फरोग मुकादम यांना देण्यात आले. याआंदोलनात ठाणे, मुंबई, नवीमुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील ऑफ्रोह चे पदाधिका-यांसह सभासद उपस्थित होते.

# ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेसला नव संजीवनी?

## जिल्हाध्यक्ष चेतनसिंग पवार यांची माहिती



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेसच्या नव्या जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड झाल्यानंतर चेतनसिह पवार यांनी पक्षाला नवसंजीवनी देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ठाणे जिल्ह्यात कांग्रेस पक्षाची झालेली वाताहात व येणाऱ्या स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुकी संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना बोलताना पवार म्हणाले की, "सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेसला नव्या उंचीवर नेण्याचे काम आगामी काळात करणार आहे."

ठाणे ग्रामीण भागात काँग्रेस पुन्हा मजबूत करण्यासाठी विविध संघटनात्मक बदल, गाव पातळीवरील सक्रियता आणि युवकांना मोठ्या प्रमाणात संधी देण्याच्या दृष्टीने योजना आखल्याचे त्यांनी सांगितले.

याज बरोबर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक ही महाविकास आघाडी पुर्ण ताकदीने लढणार असून मी कुडवली जिल्हा परिषदेमधून मी संभाव्य उमेदवार असून तेथील नागरिकांच्या अनेक समस्या आहेत त्यासोडविण्यासाठी मी ही निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रसंगी ॲड. अशोक फनाडे, ज्येष्ठ नेते तुकाराम ठाकरे, सुधीर पष्टे, प्रतीक रोकडे, अकबर खान, कारडे, शांताराम थांमणे, महिला जिल्हा अध्यक्षा चारुशीला पालवे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व कार्यकर्त्यांनी चेतनसिंग पवार यांच्या निवडीचे स्वागत करत आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसला बळकटी देण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# मराठी हिंदी वादातून कल्याणमध्ये 19 वर्षीय तरुणाची आत्महत्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मराठी विरुद्ध हिंदी बोलण्याच्या वादातून एका १९ वर्षीय कॉलेज विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना कल्याण पूर्वेत समोर आली आहे. अर्णव जितेंद्र खैरे (वय १९) या मुलाला लोकल ट्रेनमध्ये "तु मराठी बोलत नाहीस का? मराठी बोलण्याची लाज वाटते का?" असे म्हणत ४–५ जणांनी मारहाण केल्याचा गंभीर आरोप मुलाच्या वडिलांनी केला आहे. या मारहाणीमुळे निर्माण झालेल्या मानसिक तणावातूनच अर्णवने गळफास घेत आत्महत्या केली असल्याचा संशय त्यांनी पोलिसांसमोर नोंदवला आहे. कल्याण पूर्वेतील तिसगांव नाक्यावरील सहजिवन गृह निर्माण वसाहतीत हा दुदैवी अर्णव खैर रहात होता. ही घटना १८ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली असून, कोळसेवाडी पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाने पुन्हा एकदा 'मराठी–हिंदी' वादाचे विषारी राजकारण, भाषिक भेदभाव आणि त्याचा तरुणांच्या मनावर होणारा परिणाम यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.



अर्णव हा मुलुंड येथील केळकर कॉलेजचा प्रथम वर्षाचा विज्ञान शाखेचा विद्यार्थी होता. नेहमीप्रमाणे तो सकाळी अंबरनाथ–कल्याण लोकलने कॉलेजकडे निघाला. यावेळी गर्दीत एका प्रवाशाचा ताण अर्णवच्या अंगावर येत असल्याने त्याने त्यांना हिंदीत थोडं पुढे व्हा असं म्हंटल्यावर त्या मुलासोबत बोलण्याचा किरकोळ वाद झाला. अचानक आसपासच्या ४–५ जणांच्या टोळक्यांनी त्याच्यावर झडप घातली. त्या टोळक्यांनी अर्णवला "तु मराठी बोलत नाहीस का?" "मराठी बोलण्याची लाज वाटते का?" असे म्हणत त्याला ठोशांनी मारहाण केल्याची माहिती अर्णवनेच वडिलांना दिली. ही संपूर्ण घटना अर्णव अत्यंत भीतीत आणि हादरलेल्या अवस्थेत सांगत होता, असे वडिलांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे.

मारहाणीच्या दहशतीमुळे अर्णव ठाणे स्थानकावर उतरला आणि मागील लोकल घेऊन मुलुंडला पोहोचला. त्या क्षणीच त्याच्या मनात भीती, तणाव आणि धक्का खोलवर बसला होता. कॉलेजमधून लवकर घरी आलेल्या अर्णवने दुपारी परत वडिलांना फोन करून "पप्पा, मला बरे वाटत नाही… मला मारहाण केली" असे सांगितले. वडिलांनी त्याला धीर देण्याचा प्रयत्न केला. पण मुलाच्या आवाजातील भीती आणि तणाव त्यांनी प्रकर्षाने जाणवल्याचे सांगितले.

सायंकाळी ७ वाजता जितेंद्र खैरे घरी आले. दार आतून बंद होते. आवाज दिल्यावरही काहीच उत्तर मिळाले नाही. शेजाऱ्यांच्या मदतीने दार उघडल्यावर, बेडरूममध्ये १९ वर्षीय अर्णवने लाल ओढणीच्या सहाय्याने सिलींग फॅनला गळफास घेतल्याचे दृश्य त्यांच्या डोळ्यांपुढे उभे राहिले. यानंतर लागलीच त्याला रुक्मिणीबाई रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी अर्णव मृत असल्याची घोषणा केली.

याप्रकरणी अर्णवच्या वडिलांनी सखोल चौकशी करून न्याय मिळावा अशी मागणी केली आहे. तर कोळसेवाडी पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरु असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली.

# ठाणे जिल्ह्यात कर्करोग निदानासाठी फिरती कर्करोग डायग्नोस्टिक व्हॅन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यात कर्करोगाचे लवकर निदान करून नागरिकांना त्वरित उपचाराकडे प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेला कर्करोग डायग्नोस्टिक व्हॅन हा उपक्रम जिल्ह्यात अत्यंत यशस्वी ठरत आहे. ३ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नियोजित तालुक्यांमध्ये फिरत असलेल्या या व्हॅनला स्थानिक नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.

हा उपक्रम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर राबविण्यात येत आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे वेळेत निदान होणे अत्यंत गरजेचे असल्याने ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्यांना मोफत आणि सुलभ तपासणी उपलब्ध करून देणे हा व्हॅनचा उद्देश आहे. कर्करोग निदान व्हॅनद्वारे मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग प्रमुख कर्करोगांची तपासणी केली जात आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा



आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, व्हॅनमध्ये कर्करोग तपासणीसाठी आवश्यक आधुनिक उपकरणे उपलब्ध असून प्रशिक्षित वैद्यकीय टीमद्वारे नियमित तपासणी केली जाते. कर्करोगाचे निदान प्राथमिक अवस्थेत झाल्यास उपचाराने हा आजार पूर्णपणे नियंत्रित व बरा होऊ शकतो, यावर त्यांनी भर दिला.

व्हॅन सध्या नियोजित कार्यक्रमानुसार कल्याण, भिवंडी, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर तालुक्यांमध्ये फिरत आहे. स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्या समन्वयातून जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांना तारीख व ठिकाणाची माहिती वेळोवेळी दिली जात असून मोठ्या प्रमाणात लोक सहभाग वाढत आहे.

३ नोव्हेंबर पासून आज अखेर पर्यंत २ हजार ९७५ एकूण व्यक्तींची तपासणी केली असून आढळलेले संशयित व्यक्ती २८ आहेत. तपासणीत आढळलेल्या संशयित रुग्णांना पुढील तपासणी व योग्य उपचारासाठी संबंधित वैद्यकीय संस्थेकडे तात्काळ पाठविण्यात आले आहे.

"कर्करोगाचे वेळीच निदान झाले तर उपचार पूर्णपणे यशस्वी होतात. त्यामुळे नागरिकांनी या मोफत तपासणी उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा," असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

# गुंज सामाजिक संस्थेकडून मायणी शाळेला शैक्षणिक साहित्याची भेट



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : गुंज सामाजिक संस्था, मुंबई यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मायनी पेण या शाळेला शैक्षणिक साहित्याचा संच भेट म्हणून देण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला मोठा हातभार लाभणार आहे.

शाळेमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमास गुंज सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी आनंद खरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजनाताई पवार ,पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेच्या प्रतिनिधींनी गुंज सामाजिक संस्थेचे उद्दिष्ट, विविध सामाजिक उपक्रम आणि शिक्षण क्षेत्रातील कामकाज याविषयी मनोगत व्यक्त केले. सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेले कार्य असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सक्षमतेकडे पाऊल ठरावे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन्स, पेन्सिली, ड्रॉइंग साहित्य, शैक्षणिक चार्ट्स, गणित व विज्ञान शिकवणीसाठी लागणारे साहित्य, खेळण्यांचे साहित्य अशा वर्षभर पुरेल इतक्या शैक्षणिक साहित्याचे संच विद्यार्थ्यांना देण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला नक्कीच चालना मिळेल, असा विश्वास मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहशिक्षक अमित महागावकर यांनी तर आभार मंगेश पाटील यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकता दिसून येत होती. या उपक्रमामुळे मायणी शाळेला "साहित्यसंपन्न शाळा" हा नवा आत्मविश्वास लाभल्याची भावना शिक्षक व पालकांनी व्यक्त केली.

# टिटवाळ्यात कापडी पिशवी वेंडिंग मशीनचे लोकार्पण

## टिटवाळा शहर व आजूबाजूचा परिसर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी उपक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : एक पाऊल पर्यावरणाच्या रक्षणासाठी या जाणिवेतून सामाजिक दायित्व जपत श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर, टिटवाळा यांच्या सहकार्यातून घरडा केमिकल्स लि. यांच्या सौजन्याने व रेड स्वस्तिक सोसायटीचे डॉ प्रमोद नांदगावकर यांच्या संकल्पनेतून कापडी पिशवी वेंडिंग मशीनचे उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा नुकताच श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर परिसरामध्ये कल्याण डोंबिवली महानगर पालिका शॉपीग कॉम्प्लेक्स येथे संपन्न झाला.



या कापडी पिशवी वेंडिंग मशीनचा उदघाटन सोहळा केडीएमसी घनकचरा व्यवस्थापन विभाग उपायुक्त रामदास कोकरे, घरडा केमिकल्स लि. कॉर्पोरेट सोशल रेस्पॉन्सिबिलिटीचे नीरज गर्ग, विनायक दळवी, सिद्धिविनायक गणपती मंदिरचे सुभाष जोशी व रेड स्वस्तिक सोसायटीचे डॉ प्रमोद नांदगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कापडी पिशवी वेंडिंग मशीन बसविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे टिटवाळा शहरातील पर्यावरणाचे रक्षण व निसर्गाचे संवर्धन करून पुढील पिढीकरिता स्वच्छ, सुंदर व प्रदूषण विरहित शहर ठेवण्यासाठी अत्यंत घातक असलेल्या प्लास्टिकचा वापर टाळणे आवश्यक आहे. याकरिता प्लास्टिक पिशव्या वापरण्यापासून नागरिकांना परावृत्त करून टिटवाळा शहर व आजूबाजूचा परिसर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी कापडी पिशवी खरेदी करण्यास प्रवृत्त करून जनजागृती करणे आवश्यक आहे. याद्वारे वसुंधरेचे पर्यावरण संवर्धन करण्यास हातभार लागेल.

या उद्घघाटन सोहळयास विशेष अथिति पोलीस निरीक्षक पंकज गिरी, माजी उपमहापौर उपेक्षा भोईर, योगेश जोशी, प्रफ्फुल जोशी, प्रसाद जोशी, प्रभाकर उपाध्याय, अगस्तीन घुटे, आकांक्षा हिरे, शक्तिवान भोईर, विजय देशेकर, संतोष देशेकर, दीपक कांबळे, हरेन्द्र सौष्टे तसेच परिसरातील अभिषेक महिला बचतगट, दुकानदार, मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ हे सर्वजण सामाजिक बांधिलकी जपत उपस्थित होते.

### फसवणूक प्रकरणात

# डॉक्टर दाम्पत्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश परवीन सय्यद यांनी फसवणूक प्रकरणात हव्या असलेल्या डॉ. प्रसाद यादवराव साळी आणि त्यांच्या पत्नी वैशाली प्रसाद साळी यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. डॉ. प्रसाद यादवराव साळी आणि त्यांच्या पत्नी वैशाली प्रसाद साळी यांच्यावर ७० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणातील तपास अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गायकवाड यांनी १३ सप्टेंबर रोजी कल्याणच्या खडकपाडा पोलीस ठाण्यात प्रज्ञा कांबळे आणि डॉ. राहुल दुबे यांनी दोन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान गणेश पाटील आणि धनश्री गोडांबे या आणखी दोन व्यक्तींचीही फसवणूक झाल्याचे उघड झाले. तपास अधिकारी विजय गायकवाड यांनी न्यायालयासमोर अटकपूर्व जामीन अर्जाला विरोध केला आणि अनेक मुद्द्यांवर तपासाबाबत सांगितले. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकले. तक्रारदाराच्या वतीने ॲडव्होकेट हरीश नायर यांनी त्यांची बाजू मांडली आणि अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यासाठी युक्तिवाद केला.

दुसरीकडे आरोपीच्या वतीने ॲडव्होकेट अमरेश जाधव यांनी त्यांच्या बचावात आपली बाजू मांडली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर बुधवारी कल्याण जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी डॉ. प्रसाद यादवराव साळी आणि त्यांच्या पत्नी वैशाली प्रसाद साळी यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आता दोघांचीही अटक निश्चित मानली जात आहे.

# जिल्हा परिषद ठाणे येथे पोस्टल कॅम्पचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : जिल्हा परिषद, ठाणे आणि ठाणे प्रधान डाक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना पोस्ट विभागाच्या विविध सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी पोस्टल कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. हा कॅम्प बुधवार शुक्रवार, 19 ते 21 नोव्हेंबर 2025 दरम्यान जिल्हा परिषद कार्यालयाच्या पहिला मजला, सभागृह येथे पार पडत आहे.

कॅम्पमध्ये नवीन आधार नोंदणी, आधार दुरुस्ती व बाल आधार सेवा, पोस्टल लाईफ इन्शुरन्स (PLI), सुकन्या समृद्धी खाते तसेच विविध गुंतवणूक योजनांची माहिती व नोंदणी सुविधा देण्यात येत आहे.

या कॅम्पमुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणीच पोस्ट विभागाच्या महत्त्वाच्या सेवांचा लाभ मिळत असल्याने ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.




# कल्याण-नगर महामार्गावरील चुकीच्या कामामुळे वाहन चालकांना त्रास!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : कल्याण -माळशेज -नगर 61 या राष्ट्रीय महामार्गाचे रूंदीकरणासह कांक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. टोकावडे ते सावर्णे दरम्यान सध्या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतिने सुरु आहे. सदर ठेकेदाराने रस्त्यालगतची मोठमोठी झाडे तोडली तर आहेतच परंतू जूना असलेला रस्ता वीस ते पंचवीस की. मी. विनाकारण खोदुन ठेवला असल्यामुळे रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत, कोणतीही लेवल नसल्याने या रस्त्यावरून वाहतूक करणे वाहन चालकांना जिकरीचे



झाले आहे.तुम्हाला जेवढा रस्ता करायचे तेवढाच रस्ता खोदा असे परिसरातील नागरिकांचे सांगने असतानाही संबधित ठेकेदार मनमानी करत आहे. हा रस्ता आळेफाटा -नगरकडे रहदारीसाठी अत्यंत महत्वाचा आहे.शिवाय स्थानिक तालुक्यातील सावर्णे, फांगुलगव्हाण, मोरोशी, न्याहाडी, मेर्दी, वाल्हीवरे या भागातील लोकांना टोकावडे किंवा मुरबाडला येणे सध्या दुरापास्त झाले आहे. अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी दोन ते अडीज तास घालवावे लागतात. शिवाय यामध्ये अपघातग्रस्त, गरोदर महिलांना, साप, विंचू चावलेल्या पेशंटला उपचारासाठी मुरबाड माळशेज घाट पायथ्याहून आणने कठीण होऊन गेले आहे. याज बरोबर उडणार्या धुळीने स्थानिकांना सर्दी, खोकला, दम्या सारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे या सर्व गोष्टीकडे संबंधित शासकीय यंत्रणा, महामार्गाचे उप अभियंता, अभियंता डोळेझाक पणा करत असून कधीही साईडवर दिसत नसल्याचे स्थानिकांचे म्हणने असून अधिकारी ठेकेदारास पाठीशी घालत असल्याचा आरोप स्थानिक करत आहेत.

## उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा ईशारा!

**यासंदर्भात अनेक तक्रारी जि. प. माजी सदस्य सुभाष घरत यांच्याकडे आल्या नंतर त्यांनी संबंधित ठेकेदारास तोंडी समज देण्याचा प्रयत्न केला परंतू याचा कुठलाही परिणाम न झाल्याने शेवटी सुभाष घरत यांनी या संदर्भात लोकशाही मार्गाने जन आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून तशा प्रकारचा लेखी ईशारा त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. दरम्यान या संदर्भात आमच्या प्रतिनिधीनी महामार्ग अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता फोन उचलला गेला नाही.**

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024